मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » शनिवार, दि. 25 एप्रिल 2026 | पान- 1



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२


# पिंपरी-चिंचवडमध्ये सोसायट्यांवर कारवाई; एसटीपी न चालवल्याने दंड

## मैलासांडपाणी थेट ड्रेनेजमध्ये सोडल्याचा प्रकार; 70 हजारांचा दंड, नियमभंग केल्यास कठोर कारवाईचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागामार्फत शहरातील मोठ्या हाऊसिंग सोसायटीतील मैलासांडपाणी प्रक्रिया केंद्राची (एसटीपी) तपासणी मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेत उपद्रव शोध पथकाकडून मैलासांडपाणी प्रक्रिया न करता थेट ड्रेनेजलाईनमध्ये सोडणाऱ्या 12 हाऊसिंग सोसायट्यांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच, त्यांच्याकडून एकूण 70 हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.



### नियमांचे पालन न केल्यास कठोर कारवाई

» हाऊसिंग सोसायटीत मैलासांडपाणी प्रक्रिया केंद्र असूनही, प्रक्रिया न केलेले मैलासांडपाणी बाहेर किंवा ड्रेनेजलाईनमध्ये सोडणे ही गंभीर बाब आहे. त्याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. संबंधित हाऊसिंग सोसायट्यांनी नियमांचे पालन करून पाण्याचा पुनर्वापर करावा, अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल, असे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

याप्रकरणी महापालिकेच्या उपद्रव शोधपथकाकडून संबंधित हाऊसिंग सोसायटींवर कारवाई करण्यात येऊन एकूण 70 हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. त्या सोसायट्यांनी तातडीने एसटीपी सुरू न केल्यास दंडाची रक्कम वाढविण्यात येणार आहे.

### एसटीपीची तपासणी

» पर्यावरण विभागाने शहरात धडक कारवाई मोहीम राबवण्यास सुरुवात केली. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी व पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील एकूण 21 मोठ्या हाऊसिंग सोसायटीतील एसटीपीची तपासणी करण्यात आली. या पाहणीत 9 एसटीपी पूर्ण क्षमतेने सुरू असल्याचे आढळून आले. तर, 12 केंद्रांमधून मैलासांडपाणी अनधिकृतपणे प्रक्रिया न करता बाहेर सोडण्यात येत असल्याचे आढळून आले. याप्रकरणी महापालिकेच्या उपद्रव शोधपथकाकडून संबंधित हाऊसिंग सोसायटींवर कारवाई करण्यात येऊन एकूण 70 हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. त्या सोसायट्यांनी तातडीने एसटीपी सुरू न केल्यास दंडाची रक्कम वाढविण्यात येणार आहे.

ज्या हाऊसिंग सोसायट्यांनी अद्याप एसटीपी केंद्र सुरू केलेले नाही किंवा निर्माण होणारे मैलासांडपाणी प्रक्रिया न करता बाहेर सोडत आहेत, त्यांनी तात्काळ एसटीपी केंद्र सुरू करून पाण्याचा पुनर्वापर करावा. अन्यथा नळजोड खंडित करण्याची कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिकेचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी दिला आहे.

# पिंपरीतील होर्डिंग राहणार फलकमुक्त! दुर्घटना टाळण्यासाठी महापालिकेची खबरदारी

## पिंपरी-चिंचवड शहरात पावसाळ्यापूर्वी दुर्घटना टाळण्यासाठी महापालिकेने होर्डिंग रिकामे ठेवण्याचे आदेश दिले आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

वादळी वारे, अवकाळी पावसामुळे मे महिन्यामध्ये जाहिरात होर्डिंग कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे खबरदारी म्हणून शहरातील सर्व होर्डिंगवर १५ मे ते १ जून २०२६ या कालावधीत जाहिरात फलक लावू नका, असा आदेश पिंपरी महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने होर्डिंगधारकांना दिला आहे.



नेत्याचा वाढदिवस, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक यासह कोणतेही कार्यक्रम असो; होर्डिंगवर जाहिरात केली जाते. अनेक जण होर्डिंग लावण्यासाठी महापालिकेची परवानगी घेत नसल्याचे वेळोवेळी समोर आले. अशा होर्डिंगधारकांवर महापालिका प्रशासनाने गुन्हे दाखल केले आहेत. कृत्रिम प्रणालीसारख्या (एआय) तंत्रज्ञानाचाही यासाठी वापर केला जात आहे. शहरातील किवळे येथे १७ एप्रिल २०२३ रोजी अनधिकृत होर्डिंग कोसळून पाच मजुरांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेनंतर महापालिकेने शहरातील १७४ अनधिकृत होर्डिंग जमीनदोस्त केले. शहरात सद्य:स्थितीत सुमारे एक हजार ६३१ होर्डिंग अधिकृत असल्याचा दावा आकाशचिन्ह विभागाने केला आहे.

### जीवितहानी झाल्यास होर्डिंगधारक जबाबदार

» पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर होर्डिंगधारकांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी करावी. पाया, लोखंडी सांगाड्यास गंज लागला नसल्याची खात्री करावी, त्यास गंजरोधक रंग लावावा. एखादे होर्डिंग धोकादायक असल्यास ते तत्काळ काढून घ्यावे. आपल्या मालकीचे होर्डिंग वादळ, वारा, जोराची हवा याद्वारे पडणार नाही, यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना कराव्यात. त्यानंतरही कोणताही अनुचित प्रकार घडल्यास होर्डिंगधारकांना जबाबदार धरण्यात येईल. तसेच प्रत्येक होर्डिंगवर क्यूआर कोड लावणे बंधनकारक आहे. ज्या होर्डिंगवर क्यूआर कोड आणि होर्डिंगधारकांची माहिती दर्शविणारी पाटी नसेल असे होर्डिंग अनधिकृत समजून कारवाई केली जाईल, असा इशारा आकाशचिन्ह विभागाने दिला आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये ‘अभिव्यक्ती’ कला महोत्सवाची सुरेल पर्वणी..!

## नामवंत कलाकारांच्या उपस्थितीत रंगणार सांस्कृतिक जल्लोष; महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सहकार्य

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात कला, संस्कृती आणि सुरांची एक अविस्मरणीय पर्वणी रंगणार आहे. संस्कार भारती पश्चिम प्रांत पिंपरी चिंचवड समितीच्या वतीने "अभिव्यक्ती – सृजनाच्या आनंदाची कला महोत्सव २०२६" हा भव्य सांस्कृतिक महोत्सव शनिवार व रविवार, दि.२५ व २६ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे ठिकाण ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे असून, रसिकांसाठी हा कार्यक्रम एक सांस्कृतिक मेजवानी ठरणार आहे.




शनिवारी सकाळी ११ ते १२.३० या वेळेत उद्घाटन समारंभ पार पडणार असून, मंदिर स्थापत्य विषयावर ओजस हिरानी यांचे व्याख्यान होणार आहे. यानंतर नृत्यपंढरी या सत्रात श्रद्धा हर्डीकर शिंदे यांचे कथक नृत्य सादर होईल. डॉ. पं. नंदकिशोर कपोते कथ्थक नृत्य तसेच पं. कैवल्यकुमार गुरव यांचे शास्त्रीय गायन रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहे. दिवसाची सांगता 'संपूर्ण वंदे मातरम्' या देशभक्तीपर सादरीकरणाने होईल. संध्याकाळी रात्री ८ ते २ या वेळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

रविवारी सकाळी १० ते ११ या वेळेत डॉ. भावार्थ देखणे यांचे बहुरूपी भारुड सादर होणार आहे. त्यानंतर रंगमुद्रा थिएटर फाउंडेशन प्रस्तुत 'आठवणींचा गाव' या कार्यक्रमातून महाराष्ट्राच्या लोककलेचे दर्शन घडेल.'स्वरांजली – आशा भोसले विशेष' या कार्यक्रमात सुरेल गाण्यांची मैफल रंगेल.

रविवारच्या पुढील सत्रात पं. सुधाकर चव्हाण यांचे शास्त्रीय गायन, डॉ. संध्या पुरेचा यांचे भरतनाट्यम नृत्य आणि पद्मश्री पं. रोणू मजुमदार यांचे बासरी वादन हे कार्यक्रम विशेष आकर्षण ठरणार आहेत. रात्री 'त्या तिघी' या सादरीकरणातून स्वातंत्र्यकुंडातील सावरकर घराण्यातील तीन वीरांगनांची गाथा उलगडली जाणार असून, शेवटी 'संपूर्ण वंदे मातरम्'ने महोत्सवाची सांगता होईल. या महोत्सवाचे आयोजन आणि नियोजन लीना आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. तसेच महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे सहकार्य लाभले आहे.

"परंपरा, प्रतिभा आणि सुरांचा सुरेल संगम" अशी ओळख असलेला हा महोत्सव पिंपरी-चिंचवडकरांसाठी कला, संस्कृती आणि सृजनाचा एक अनोखा उत्सव ठरणार आहे. विविध कलाप्रकार, दिग्गज कलाकार आणि सांस्कृतिक वारशाचा संगम अनुभवण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

> **“पिंपरी-चिंचवड ही केवळ औद्योगिक नगरी नसून ती समृद्ध कला, संस्कृती आणि परंपरेचीही भूमी आहे. 'अभिव्यक्ती' सारखे महोत्सव आपल्या नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख करून देतात आणि कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देतात. परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम घडवणारा हा उपक्रम शहराच्या सांस्कृतिक वैभवात निश्चितच भर घालणारा ठरेल.**
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# जनगणनेतील प्रत्येक टप्पा अचूक आणि सुलभ पद्धतीने पार पाडा : अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम

## जनगणनेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणक, पर्यवेक्षक आणि फील्ड ट्रेनर्स यांना केले मार्गदर्शन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जनगणना मोहिमेअंतर्गत प्रशिक्षण प्रक्रियेला गती मिळाली असून अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी आकुर्डी येथील ग.दि. माडगूळकर सभागृहात सुरू असलेल्या प्रशिक्षण सत्राला भेट देत मार्गदर्शन केले. त्यांनी प्रशिक्षणाची प्रत्यक्ष पाहणी करून संपूर्ण कार्यपद्धतीचा आढावा घेतला.



या भेटीदरम्यान उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार, सहा.आयुक्त किरणकुमार मोरे, चार्ज अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे आदी उपस्थित होते.

प्रशिक्षणामध्ये प्रगणक, पर्यवेक्षक आणि फील्ड ट्रेनर्स यांना दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनाची सविस्तर माहिती जंगम यांनी घेतली.प्रशिक्षणाची रचना, विषयांची मांडणी आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी याबाबत समाधान व्यक्त करत त्यांनी प्रशिक्षण अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या. जनगणनेतील प्रत्येक टप्पा अचूक आणि सुलभ पद्धतीने पार पाडण्यासाठी कर्मचाऱ्यांना आवश्यक ते कौशल्य देण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

विशेषतः घरगुती सर्वेक्षण, माहिती संकलनातील काटेकोरपणा, नागरिकांशी संवाद कौशल्य आणि डिजिटल साधनांचा वापर या बाबींचे प्रशिक्षण प्रभावीपणे दिले जात असल्याचे त्यांनी पाहिले. अॅप-आधारित डेटा नोंदणी आणि पडताळणी प्रक्रियेमुळे काम अधिक सुलभ आणि पारदर्शक होत असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार म्हणाले की, प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक प्रगणक व पर्यवेक्षकाला प्रत्यक्ष कामासाठी सक्षम केले जात आहे. अचूक माहिती संकलन आणि वेळेवर डेटा सादर करणे हीच या प्रक्रियेची खरी किल्ली असून त्यासाठी आम्ही सर्व पातळ्यांवर काटेकोर नियोजन केले आहे. जनगणनेचा पहिला टप्पा १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान होणार असून, त्याअंतर्गत विविध क्षेत्रीय कार्यालयांमध्ये तीन दिवसीय प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात आली आहेत.

> **जनगणना ही शहराच्या नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची आणि मूलभूत प्रक्रिया आहे. शहराच्या पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, वाहतूक, पाणीपुरवठा यांसारख्या विविध क्षेत्रांतील भविष्यातील नियोजन हे अचूक लोकसंख्येच्या माहितीवरच अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याने आपली जबाबदारी ओळखून अत्यंत दक्षतेने आणि प्रामाणिकपणे काम करणे गरजेचे आहे. जनगणना प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यावर समन्वय, शिस्त आणि वेळेचे पालन राखले, तरच अचूक व विश्वासार्ह माहिती संकलित होऊ शकते. ही केवळ शासकीय जबाबदारी नसून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकाने योगदान देण्याची ही एक महत्त्वाची संधी आहे.**
>
> **- कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> **जनगणना प्रक्रियेत अचूकता आणि वेळेचे नियोजन ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. प्रत्येक प्रगणक व पर्यवेक्षकाने प्रशिक्षणात दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करून नागरिकांकडून विश्वसनीय माहिती संकलित करणे आवश्यक आहे. डिजिटल साधनांचा प्रभावी वापर, डेटा पडताळणीतील दक्षता आणि नागरिकांशी सकारात्मक संवाद यामुळे ही प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक होईल. योग्य नियोजन आणि समन्वयाच्या बळावर आपण जनगणना प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करू शकतो.**
>
> **- सचिन पवार, उप आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# पीपीपी मॉडेल रस्ते कामांवर प्रश्नचिन्ह; महापालिकेकडे चौकशीची मागणी

## पीपीपी रस्ते प्रकल्पात अनियमिततेचा आरोप; खर्च, दर्जा आणि प्रक्रियेच्या चौकशीची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या अंतर्गत पीपीपी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) मॉडेलअंतर्गत करण्यात आलेल्या रस्ते बांधकामांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, या सर्व कामांची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात मनपाचे माजी विरोधी पक्षनेते उज्ज्वल केसकर, सुहास कुलकर्णी आणि माजी नगरसेवक प्रशांत बधे यांनी आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन दिले असल्याची माहिती पत्रकार परिषदेत दिली.

क्रेडिट नोटच्या माध्यमातून पीपीपी तत्वावर रस्ते बांधकामाची कामे देण्यात आली असून, हे मॉडेल कायदेशीरदृष्ट्या वादग्रस्त असल्याचा आरोप करून प्रत्यक्षात केलेल्या कामांची आणि त्याच्या खर्चाची सखोल तपासणी करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

पीपीपी मॉडेलअंतर्गत एकूण २० रस्त्यांची कामे देण्यात आली असून, त्यांची यादीही निवेदनासोबत जोडली आहे. ही सर्व कामे प्रशासकीय राजवटीच्या काळात मंजूर करण्यात आली असून, त्यासाठी स्वतंत्र सल्लागार नेमले होते. पूर्ण झालेल्या कामांची तपासणी करण्यासाठीही सल्लागार नेमल्याचे समोर आले आहे.



### खर्च दुप्पट दाखवल्याचा आरोप

» या प्रकल्पांतर्गत ३९.०३ किलोमीटर रस्त्यांसाठी १०२६ कोटी रुपयांची निविदा मंजूर करण्यात आली आहे. यानुसार प्रती किलोमीटर खर्च २६ कोटी २८ लाख रुपये इतका ठरतो. नियमित रस्ते बांधकामाचा खर्च १२ ते १३ कोटी रुपये असताना हा खर्च जवळपास दुप्पट असल्याचा आरोप करण्यात आला आहे. करदात्यांच्या पैशांचा अपव्यय झाल्याची टीकाही करण्यात आली. त्यामुळे या खर्चाची तांत्रिक व आर्थिक तपासणी करण्याची मागणी जोर धरत आहे.

त्यामुळे कामांची गुणवत्ता आणि प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकल्पांअंतर्गत एकूण रस्त्यांची लांबी ३९.०३ किलोमीटर इतकी असून, निविदेची एकूण रक्कम १०२६ कोटी रुपये आहे. यानुसार प्रती किलोमीटर सरासरी खर्च २६ कोटी २८ लाख रुपये इतका येतो. प्रत्यक्षात हा खर्च दुप्पट दाखवल्याची या मंडळींची तक्रार आहे.

मनपाच्या नियमित रस्ते बांधकामाचा सरासरी दर प्रती किलोमीटर १२ ते १३ कोटी रुपये असताना, पीपीपी मॉडेलअंतर्गत खर्च जवळपास दुप्पट आहे. स्पेसिफिकेशननुसार दरात काही प्रमाणात फरक होऊ शकतो. मात्र, एवढी मोठी तफावत ही चिंताजनक असून, हा सर्वसामान्य करदात्यांच्या पैशांवर एकप्रकारे डल्ला आहे, असाही या मंडळींचा आरोप आहे.

सामान्यतः रस्ते बांधकामासाठी आठ इंच मुरूम, आठ इंच जीएसबी, चार इंच डीएलसी आणि आठ इंच एम ४० कॉंक्रीट या स्पेसिफिकेशननुसार काम केले जाते. या निकषांचे पालन प्रत्यक्षात झाले आहे का, याचीही तपासणी करावी. या प्रकरणात पारदर्शकता आणि आर्थिक गैरव्यवहार टाळण्यासाठी संपूर्ण प्रकल्पाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

### रस्ते कामांवर प्रश्नचिन्ह

» पुणे महापालिकेच्या पीपीपी मॉडेलअंतर्गत करण्यात आलेल्या रस्ते कामांबाबत माजी पदाधिकाऱ्यांनी गंभीर आक्षेप घेतले आहेत. या प्रकल्पांतर्गत २० रस्त्यांची कामे देण्यात आली असून, ती प्रशासकीय राजवटीच्या काळात मंजूर झाली होती. कामांची प्रक्रिया, गुणवत्ता आणि खर्च यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. या सर्व कामांची स्वतंत्र आणि सखोल चौकशी करण्याची मागणी आयुक्तांकडे करण्यात आली आहे. यामुळे शहरातील या बहुचर्चित रस्ते प्रकल्पांवर पुन्हा वाद निर्माण झाला आहे.

### दर्जा तपासणीची मागणी

» रस्ते बांधकामासाठी ठरलेल्या तांत्रिक निकषांचे पालन झाले का, यावरही शंका व्यक्त करण्यात आली आहे. आठ इंच मुरूम, आठ इंच जीएसबी, चार इंच डीएलसी आणि आठ इंच एम-४० कॉंक्रीट या निकषांनुसार कामे झाली का, याची तपासणी व्हावी, अशी मागणी करण्यात आली. पूर्ण झालेल्या कामांसाठी वेगळे सल्लागार नेमल्यानेही संशय व्यक्त केला जात आहे. प्रकल्पात पारदर्शकता ठेवून दोषींवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडूनही होत आहे..

# पुण्यात महिलांच्या नावावरील घरांना 50% मिळकत कर सवलत; स्थायी समितीची मंजुरी

## 500 चौरस फुटांपर्यंतच्या घरांसाठी मोठा दिलासा; 70 हजार मिळकतींना होणार फायदा, प्रस्ताव मुख्य सभेकडे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे: महानगरपालिका हद्दीतील फक्त महिलांच्या नावावर असलेल्या 500 चौरस फुटांपर्यंतच्या निवासी मिळकतींना मिळकत करात 50 टक्के सवलत देण्याच्या प्रस्तावाला स्थायी समितीने मान्यता दिली आहे. प्रशासनाने तयार केलेला हा प्रस्ताव आता मुख्य सभेकडे अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात येणार असून, त्यानंतर राज्य शासनाकडे पाठविला जाणार आहे.

महापालिकेच्या नोंदीनुसार अशा मिळकतींची संख्या सुमारे 70 हजार 773 इतकी आहे. या मिळकतींकडून सध्या मिळकत कराच्या स्वरूपात सुमारे 40.48 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते.



प्रस्तावित 50 टक्के सवलतीमुळे महापालिकेच्या उत्पन्नात सुमारे 20 कोटी रुपयांची घट होण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

यासंदर्भात मुख्य विधी अधिकाऱ्यांचा अभिप्राय घेऊन त्यालाही मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियममधील कलम 140-अ आणि 140-बअंतर्गत तरतुदींनुसार हा प्रस्ताव तयार केला आहे.

मात्र, या योजनेची अंमलबजावणी काही अटींवर आधारित असेल. 31 मार्च 2025 रोजी महिलांच्या नावावर नोंद असलेल्या मिळकतींनाच या सवलतीचा लाभ मिळेल. तसेच, ही सवलत केवळ आर्थिक वर्ष 2026-27 मधील चालू मागणीपुरती मर्यादित राहील.

अनधिकृत मिळकतींवरील शास्ती कायम राहणार असून, संबंधित कलम 267 (अ) लागू राहील. सध्या 40 टक्के सवलत असलेल्या मिळकतींना 50 ऐवजी 25 टक्के सवलत देण्याचा प्रस्ताव आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार असली, तरी उत्पन्नातील घट लक्षात घेता मुख्य सभेत यावर सविस्तर चर्चा अपेक्षित आहे.

### योजना ठरणार फायदेशीर

» 1 एप्रिल 2026 पूर्वीची थकबाकी, व्याज, दंड व शास्तीवर कोणतीही सवलत लागू होणार नाही. अनधिकृत मिळकतींवरील शास्ती कायम राहणार असून, संबंधित कलम 267 (अ) लागू राहील. सध्या 40 टक्के सवलत असलेल्या मिळकतींना 50 ऐवजी 25 टक्के सवलत देण्याचा प्रस्ताव आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार असली, तरी उत्पन्नातील घट लक्षात घेता मुख्य सभेत यावर सविस्तर चर्चा अपेक्षित आहे.

# बारामती मतदारांमध्ये निरुत्साह; 58.27 टक्के मतदान

## महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार या विजयाचा आणि मताधिक्याचा नवा विक्रम प्रस्थापित करणार का? याची उत्सुकता वाढली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

बारामतीपोटनिवडणुकीसाठी मतदारांमध्ये निरुत्साह राहिल्याने सुमारे ५८.२७ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. गेल्या निवडणुकीत ७१.८६ टक्के मतदान झाले होते. मतमोजणी चार मे रोजी मतमोजणी होणार असून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या मताधिक्याचा विक्रम नोंदविणार का, याबाबत उत्सुकता असणार आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे झालेल्या या पोटनिवडणुकीत राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या महायुतीच्या उमेदवार आहेत. काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनी माघार घेतल्यामुळे प्रमुख राजकीय पक्षांचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात नाहीत. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह २३ उमेदवार आहेत.



मतदानाला सकाळी सात वाजता सुरुवात झाली. पहिल्या दोन तासांमध्ये आठ टक्के मतदारांनी मतदान केले. त्यानंतर दुपारी एक वाजेपर्यंत ३१.९१ टक्के मतदान झाले. उन्हामुळे दुपारी मतदानाचे प्रमाण आणखी कमी झाले. दुपारी तीन वाजेपर्यंत ४०.३६ टक्के मतदारांनी मतदान केले. दुपारी चारनंतर मतदानासाठी रांगा लागल्या.

सायंकाळी पाच वाजेपर्यंत सुमारे ५२.४८ टक्के म्हणजे दोन लाख एक हजार ८०८ मतदारांनी मतदान केले. शेवटच्या तासामध्ये मतदानाचे प्रमाण वाढले. त्यामुळे मतदानाची टक्केवारी सुमारे ५८.२८ टक्क्यांपर्यंत पोहोचली. या मतदारसंघात तीन लाख ८४ हजार ५७९ मतदार असून, त्यापैकी दोन लाख २४ हजार ८७ मतदारांनी मतदान केले.

'अजित पवार यांनी बारामतीसाठी वर्षानुवर्षे केलेल्या विकासकामांची परतफेड बारामतीकर मतदानातून करतील, असा विश्वास आहे. ही निवडणूक केवळ राजकीय नाही, तर भावनिकही आहे. लोकांनीच ही निवडणूक हातात घेतली' अशी भावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केली.

मतदानापूर्वी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विद्या प्रतिष्ठान येथे अजित पवार यांच्या स्मृतीस्थळाला भेट देऊन दर्शन घेतले. काटेवाडी येथील मतदान केंद्रावर त्यांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यावेळी त्यांच्याबरोबर जय पवार आणि खासदार पार्थ पवार यांनीही मतदान केले.

### आता नजरा मतमोजणीकडे

» या पोटनिवडणुकीत महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्यासह एकूण २३ उमेदवार मैदानात आहेत. काँग्रेसचे उमेदवार माघार घेतल्याने लढत एकतर्फी झाल्याची चर्चा रंगली होती. मतमोजणी ४ मे रोजी होणार असून निकालाकडे राज्याचे लक्ष लागले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार किती मताधिक्याने विजय मिळवतात, याची उत्सुकता निर्माण झाली आहे. बारामतीच्या राजकारणात या निकालाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

### मतदानात घट

» बारामती पोटनिवडणुकीत एकूण ५८.२८ टक्के मतदानाची नोंद झाली. मागील विधानसभा निवडणुकीत येथे ७१.८६ टक्के मतदान झाले होते. त्यामुळे यंदा सुमारे १३ टक्क्यांनी मतदान कमी झाल्याचे दिसून आले. सकाळपासून मतदान केंद्रांवर संथ गती होती. दुपारच्या उन्हामुळे अनेक मतदार घराबाहेर पडले नाहीत. मात्र सायंकाळी मतदान संपण्याच्या आधी काही केंद्रांवर रांगा लागल्या. शेवटच्या तासात झालेल्या मतदानामुळे अंतिम टक्का वाढल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

### विक्रम नोंदविण्याची संधी

» बारामतीतील मताधिक्याचा विक्रम दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावावर आहे. ते २०१९ मध्ये एक लाख ६५ हजार २६५ मताधिक्याने विजयी झाले होते. अजित पवार यांनी भाजपचे तत्कालीन उमेदवार गोपीचंद पडळकर यांचा पराभव केला होता. आता दोन लाख २४ हजार ८७ मतदारांनी मतदान केले असल्याने मताधिक्याचा विक्रम मोडला जाण्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

# पुणे ठरणार जागतिक 'ग्लोबल ग्रोथ हब'; पीएमआर विकास आराखडा तयार करण्यास सुरुवात

## नीती आयोगाच्या पुढाकाराने मॅकेंझी कंपनीकडून सविस्तर आराखडा; जूनमध्ये राज्य सरकारकडे सादर होणार अहवाल

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेशाला (पीएमआर) जागतिक स्तरावरील 'ग्लोबल ग्रोथ हब' म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची पावले उचलली जात असून, यासाठी सविस्तर विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. सल्लागार म्हणून नियुक्त 'मॅकेंझी' कंपनीमार्फत हा अहवाल तयार केला जाणार असून, तो प्रथम नीती आयोगाकडे सादर होऊन जून महिन्यात राज्य सरकारकडे सुपूर्त केला जाणार आहे. राज्य सरकारने पुण्याला जागतिक दर्जाचे आर्थिक केंद्र बनविण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे



या पार्श्वभूमीवर नीती आयोगाच्या पुढाकारातून पुण्याच्या सर्वांगीण विकासासाठी व्यापक योजना आखण्यात आली आहे. वित्त आयोगाचे अध्यक्ष नितीन करीर यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी पुण्यात 'पुणे ग्रोथ हब' संदर्भात कार्यकारी समितीची बैठक पार पडली. या बैठकीला विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्यासह पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमआरडीए, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, रेल्वे आणि रस्ते विकास महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत पुणे शहर आणि परिसरातील सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित विकासकामांचा सखोल आढावा घेण्यात आला. रस्ते, रेल्वे, उड्डाणपूल, मेट्रो, भूमिगत बोगदे यासारख्या पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य देण्यात येणार आहे. औद्योगिक आणि निवासी क्षेत्राचा समतोल विकास साधण्यासाठी एमआयडीसी क्षेत्रांचा विस्तार तसेच पुरंदर विमानतळ परिसरात गृहप्रकल्प, वेलनेस सेंटर, कृषी पर्यटन आणि साहसी क्रीडा सुविधा उभारण्याच्या शक्यता तपासल्या जात आहेत.

याशिवाय शहरासमोरील पाणीटंचाई, वाहतूक कोंडी आणि सांडपाणी व्यवस्थापन, या गंभीर समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला. विविध विभागांकडून राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांचा आढावा घेऊन त्यानुसार 'मॅकेंझी' कडून अंतिम आराखडा तयार केला जाणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर पुण्याचा नियोजनबद्ध आणि वेगवान विकास साधण्याचा प्रयत्न असून, आराखडा सादर झाल्यानंतर प्राधान्याने निवडलेल्या प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### प्रकल्पांना गती मिळण्याची शक्यता

» समृद्धी महामार्गाशी जोडणी, पुणे-छत्रपती संभाजीनगर महामार्ग, कल्याण-भीमाशंकर मार्ग तसेच पुणे-बंगळुरू महामार्ग या महत्त्वाच्या प्रकल्पांना 'पुणे ग्रोथ हब' संकल्पनेमुळे गती मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सर्व विभागांच्या समन्वयातून अहवाल तयार केला जाईल, अशी माहिती दिली.